# <u>: प्रेस नोट :-</u>

**कक्ष ११, गु.प्र.शा., गु.अ.वि., कांदिवली-प, मुंबई** **दिनांकः-२२/०९/२०२२.**

**‘‘ कथीत राजे महाराजे कडुन करोडो रुपयांचे लोन देण्याचे आमीष दाखवुन, मॅन्डेट फी, विमा फी म्हणुन लाखो रुपये घेवुन कुठल्याही प्रकारचे लोन न देता आर्थिक फसवणुक करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केलेबाबत.’’**

| | |
|---|---|
| कक्ष | कक्ष-११, गुन्हे प्रकटीकरण शाखा, गु.अ.विभाग, कांदिवली पश्चिम, मुंबई. |
| पोलीस ठाणे | कांदिवली पोलीस ठाणे |
| गु.नों.क्र. व कलम | गु.प्र.शा., गु.अ.वि., गु.नो.क्र.१४७/२०२२ (कांदिवली पोलीस ठाणे गु.नो.क्र. १२३४/२०२२) कलम ४२०, १२०ब, ५०६(२) भादवि |
| दाखल दिनांक | दिनांक २१/०९/२०२२ रोजी ११.१० वा |
| गुन्हा घडला दिनांक, वेळ व ठिकाण | मार्च २०२१ ते मार्च २०२२ च्या दरम्यान.<br>बंगलो नंबर ३०५/२५७, सेक्टर ०६, चारकोप, कांदिवली प., मुंबई ६७ |
| फिर्यादीचे नाव | पुरुष, वय-४४ वर्षे |
| अटक आरोपीची संख्या | ०२ |
| थोडक्यात प्रेस नोट | गुन्हे शाखाा, कक्ष-११ कडील **सपोनि विशाल पाटील** यांना अशी माहिती मिळाली की, मुंबई शहरामध्ये काही ईसम हे ज्यांना बॅका लोन देत नाही किंवा त्यांचे खाते एन पी ए झालेले आहे परंतु त्यांना मोठया रक्कमेच्या लोनची आवश्यकता आहे अशा व्यवसायीकांना एजंट मार्फत शोधुन त्यांना राजस्थान मधील कथीत राजे महाराजे यांचेकडे करोडो रुपये असुन ते त्यांना कमी व्याजदरात लोन स्वरुपात दयायला तयार आहेत असे सांगुन त्यांना करोडो रुपयांचे बिझनेस लोन देण्याचे आमीष दाखवुन नंतर मॅन्डेड फी, लोन विमा व इंग्लीश मॉरगेज स्टॅम्प डयुटीच्या नावाखाली त्यांचेकडुन करोडो रुपये घेवुन त्यांना कुठल्याही प्रकारचे लोन मंजुर न करता त्यांची करोडो रुपयांची फसवणुक करणाऱ्या टोळी बाबत गोपनीय माहीती प्राप्त झाली.<br><br>वरील माहितीवरुन ज्या इसमांची अशाप्रकारचे फसवणुक झालेली आहे, अशा इसमांचा शोध घेण्यात आला व त्यामध्ये एका फसवणुक झालेल्या इसमाचा चौकशीकामी अर्ज प्राप्त करण्यात आला. सदर अर्जाच्या चौकशीवरुन मा. वरीष्ठांचे आदेशाने फसवणुक करणाऱ्या इसमांविरुध्द वर प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दि.२१/०९/२०२२ रोजी कक्ष कार्यालयाचे **पोनि घोणे, सपोनि जाधव, मसपोनि यादव, सपोनि पाटील व अंमलदार** यांनी उल्हासनगर व अंबरनाथ जि.ठाणे येथुन सदर टोळीतील दोन सुत्रधार यांना ताब्यात घेवुन चौकशीअंती अटक केलेली आहे.<br><br>सदर अटक आरोपी यांचेकडे केलेल्या तपासांमध्ये त्यांनी सदर गुन्हयातील पाहीजे आरोपी दिपक सौदा हा **कधी बॅकेचा अधिकारी कधी राजस्थान मधील कथीत राजा महाराजा तर कधी मोठा शासकीय अधिकारी** याचा रोल करीत असल्याचे सांगीतले असुन सदर पाहीजे आरोपी याचा शोध कक्ष-११ |

| | |
|---|---|
| | कार्यालयाकडुन चालु आहे.<br>नमूद गुन्हयात खालील दोन आरोपीतांना अटक करण्यात आलेली असुन त्यांना पोलीस कोठडी रिमांडकामी मा.३७ वे न्यायालय, किल्ला कोर्ट, मुंबई येथे हजर केले असता त्यांना दि.२८/०९/२०२२ पावेतो पोलीस कोठडी रिमांड मिळालेला आहे.<br>१) एक पुरुष, वय-३८ वर्षे, रा.ठी. उल्हासनगर, जि.ठाणे<br>२) एक पुरुष, वय-३६ वर्षे रा.ठी. अंबरनाथ पुर्व, जि. ठाणे<br>याव्दारे गुन्हे शाखेकडुन आवाहन करण्यात येते की, अशाप्रकारे कर्ज देणाऱ्या टोळीच्या आमीषाला बळी पडु नये व ज्यांची अशा प्रकारे फसवणुक झालेली आहे त्यांनी त्यांची तक्रार ही गुन्हे शाखा, कक्ष-११, कांदिवली पश्चिम, मुंबई यांचेकडे नोंदवावी. |

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. सुहास वारके, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. एस. विरेश प्रभू, मा. पोलीस उप-आयुक्त (प्र-१) श्री. संग्रामसिंह निशाणदार, सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रकटीकरण-उत्तर) श्री. काशिनाथ चव्हाण, प्रभारी पोलीस निरीक्षक विनायक चव्हाण यांच्या मागदर्शनाखाली पोनि भरत घोणे, स.पो.नि. अभिजीत जाधव, मसपोनि पुनम यादव, सपोनि विशाल पाटील, अंमलदार सुधीर तरटे, जयेश केणी, सचिन खताते, महेश रावराणे, किशोर शिंदे, सारीका कदम, सुशांत पाटील यांनी पार पाडली आहे.

***** D-1/28/2022*****